स्थापना : जून २००० (शासन क्र. एनजीसी २०००/न.म.वि.(१/२०००)म.शि.-३/वि. २८ जून २०००)

College Code No. : 337

महाविद्यालय कोड क्र. ३३७

Amrut Sevabhavi Sanstha Parbhani's

**Late Ku. Durga K. Banmeru Science College,**
(B.Sc.,B.B.A.,B.C.A.,M.Sc.(Comp. Science))
Loni Road, Lonar Dist. Buldhana - 443302
Ph./Fax No. : 07260 - 221315
(Affiliated to Sant Gadgebaba Amravati University, Amravati
& UGC 2 (f) & 12 (B) approved)

अमृतं तु विद्या। विज्ञानं यज्ञ तनुते ।।

अमृत सेवाभावी संस्था, परभणी द्वारा संचलित

**कै.कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय,**
(बी.एस्सी.,बी.बी.ए.,बी.सी.ए.,एम.एस्सी. (कॉम्प्यु.सायन्स))
लोणी रोड, लोणार जि. बुलढाणा - ४४३३०२
दूरध्वनी / फॅक्स क्र. : ०७२६० - २२१३१५
(संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नीत व
युजीसी २ (एफ) व १२(बी) मान्यता प्राप्त)

www.lkdkbanmerucollege.ac.in E-mail : pkbanmeru@yahoo.co.in; lkdkbscl@rediffmail.com

**Dr. Prakash K. Banmeru**
Principal

**Dr. Santosh K. Banmeru**
Secretary

**डॉ.प्रकाश क. बनमेरू**
[redacted] प्राचार्य

**डॉ.संतोष क. बनमेरू**
सचिव

## Implementation of guidelines of statutory/regulatory bodies

## (Pages from College Prospectus Reflecting This)




Principal
प्राचार्य
Late. Ku. Durga K. Banmeru Science College
LONAR, Dist.Buldhana

## रॅगिंग अपराधास सहाय्य केल्याचे केंव्हा मानले जाईल ?

कलम ६ अन्वये रॅगिंगची तक्रार केली असताना कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने कारवाई करण्यास शैक्षणीक संस्थेचा प्रमुख कसुर किंवा हयगया करीत असेल तर अशा व्यक्तीस रॅगिंगसारख्या गुन्हास सहाय्य केल्याचे मानन्यात येईल. अशा शैक्षणीक संस्थेच्या प्रमुखास अपराध सिध्दीनंतर कलम ४ नुसार शिक्षा केली जाऊ शकते.

## ॲन्टी रॅगिंग व शिस्त पालन समिती

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| ०१ | प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू | अध्यक्ष |
| ०२ | प्रा.डॉ. मिलींद वि. गायकवाड | सदस्य |
| ०३ | प्रा. सुर्यकांत भा. बोरूळ | सदस्य |
| ०४ | प्रा. शारिक एस. शेख | सदस्य |
| ०५ | श्री. जिर्तेद्र रा. डांगे | सदस्य |

## महिला तक्रार निवारण समिती कार्य

१. विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयात सुरक्षीत वातावरण निर्मिती.

२. मुलींसाठी तकार पेटीची व्यवस्था.

३. मुलींच्या संदर्भातील तकारीवर कार्यवाही करण्यासाठी तक्रार निवारण समितीची स्थापणा करण्यात आली आहे.

४. महाविद्यालयातील विद्यार्थीनीना महिला विषयक कायदयाच्या ज्ञानासाठी कायदे विषयक साक्षरता शिबिराचे आयोजन.

५. वर्गखोल्यात ,प्रयोगशाळेत व ग्रंथालयात सी.सी.टीव्ही ची व्यावस्था.

## महिला तक्रार निवारण समिती

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| ०१ | सौ. उषा ता. गोले | अध्यक्षा |
| ०२ | प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू | सचिव |
| ०३ | प्रा.डॉ. मिलींद वि. गायकवाड | सदस्या |
| ०४ | प्रा. सुर्यकांत भा. बोरूळ | सदस्या |
| ०५ | सौ. मिना सु. बनमेरू | सदस्या |

Principal
प्राचार्य
Late. Ku. Durga K. Banmeru Science College
LONAR, Dist.Buldhana

## विद्यार्थ्यांकरिता आचारसंहिता :

* संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व बोर्डाच्या अभ्यासक्रमात व नियमानुसार महाविद्यालयात शिक्षणाची सोय उपलब्ध राहील प्रत्येक विद्यार्थ्यांची सर्व विषयाची हजेरी किमान ८० टक्के असणे अनिवार्य आहे. त्याशिवाय विद्यार्थी विद्यापीठाच्या परीक्षेस पात्र ठरणार नाही.
* महाविद्यालयात तासीका/प्रात्यक्षिकास गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यास प्रती १.०० रु. याप्रमाणे दंड केला जाईल.
* एन.एस.एस. पथकातील स्वयंसेवकाने १२० तास कार्य करणे आवश्यक आहे.
* प्रत्येक विद्यार्थ्याने शैक्षणिक सत्राच्या शेवटी शारिरीक क्षमता चाचणी पास होणे आवश्यक आहे.
* प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या वैद्यकीय तपासणीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यास १५ रु. दंड ठरविला जाऊ शकतो.
* प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या निरनिराळ्या शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रमात, कार्यक्रमात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यास प्रतिकार्यक्रम रु. १० दंड ठरविला जाऊ शकतो.
* प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या युनीट टेस्ट, तसेच इतर परिक्षांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येक पेपर साठी रु. ५० दंड केला जाईल.
* महाविद्यालयातर्फे होणाऱ्या प्रथम सत्र व सराव परीक्षा शुल्क रु. ३०० असेल.
* ग्रंथालय, वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, व महाविद्यालयातील आवारातील इतर ठिकाणचे सामान, फर्निचर, वर्तमानपत्र, पुस्तके, प्रयोगशाळा साहित्य, खेळाचे सामान, इत्यादी उपलब्ध करून दिले जाते. त्याचे विद्यार्थ्याकडून कोणतीही नासधूस झाली किंवा गहाळ झाल्यास त्याची दिडपट नुकसान भरपाई विद्यार्थ्याकडून भरून घेतली जाईल.
* तासीका सुरु असताना विद्यार्थ्यांनी व्हरांड्यात फिरू नये.
* विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे अधिकारी, प्राध्यापक व कर्मचाऱ्याशी तसेच इतर विद्यार्थ्यांशी स्वत:ची वागणूक सौजन्यशील ठेवावी. याबाबत गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालयातून काढुन टाकण्यात येईल.
* महाविद्यालयातील एन.एस.एस. सायन्य क्लब, किंवा इतर उपक्रमात भाग घ्यायचा असेल तर अर्ज करावा लागेल.
* प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या आवारात असताना स्वत:चे ओळखपत्र जवळ ठेवावे. ओळखपत्र दाखविल्या शिवाय ग्रंथालयातून अथवा प्रयोगशाळेतून कोणतेही साहित्य, ग्रंथ मिळणार नाही.
* महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर ग्रंथालय कार्ड दिले जाईल. त्या कार्डाचा उपयोग ते कार्ड ज्याच्या नावावर असेल त्यालाच एकावेळी एक पुस्तक दिला जाईल. कार्ड हरविल्यास रु. ५ शुल्क भरुन नवीन कार्ड मिळु शकेल. प्रत्येक ग्रंथ विद्यार्थ्याला कमाल ७ दिवस ठेवता येईल. सात दिवसाच्या आत पुस्तक ग्रंथालयात परत करावे लागेल. अन्यथा ५० पैसे प्रतिदिन याप्रमाणे दंड लावण्यात येईल. पुस्तकांचे/ग्रंथाचे नुकसान झाल्यास त्या ग्रंथाची वर्तमान किंमतीच्या दिडपट रक्कम दंड भरावा लागेल, त्यानंतरच दुसरे पुस्तक मिळु शकेल.
* ग्रंथालयातील ग्रंथ परत केल्याशिवाय विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या परीक्षेचे प्रवेशपत्र मिळणार नाही. परिक्षा कालावधीत अभ्यासाकरिता पुस्तके, त्यांच्या किमतीएवढी रक्कम ग्रंथालयात अनामत रक्कम भरल्यास मिळु शकतील.
* विद्यापीठ परीक्षेच्या आवेदनपत्रात विद्यार्थ्यांनी अपुर्ण भरलेली माहिती किंवा त्रुटीमुळे जर विद्यापीठाकडून परीक्षेत बसण्याची परवानगी नाकारण्यात आल्यास अथवा निकाल राखून ठेवल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील.
* ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात रोज येण्याजाण्याकरीता बस प्रवासाचा पास आवश्यक असेल त्यांनी प्रवेश अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. नोंद केलेली नसल्यास सवलत मिळणार नाही.
* प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालय सोडल्यानंतर एका शैक्षणिक सत्राच्या आत स्वत:चा दाखला व इतर कागदपत्रे घेवून जाणे आवश्यक आहे. जर एका सत्राच्या आत दाखला व इतर कागदपत्रे नेण्यात आले नाहीत तर पुढच्या प्रत्येक सत्राकरिता रु.५ विलंब शुल्क भरावा लागेल.
* शै.सत्र २०११-१२ पासून विद्यार्थी सुरक्षा विमा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येते. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या मृत्यू झाल्यास रु. ३,५०,०००/- चा मोबदला व अपघात झाल्यास वैद्यकीय प्रतिपुर्ती म्हणून रु. ३५,०००/- विद्यापीठा कडून देण्यात येतात.
* विद्यार्थ्याने प्रवेश घेताना सादर करावयाच्या मुळ

कागदपत्रांच्याआवश्यक तेवढ्या सत्यप्रती स्वत:जवळ ठेवाव्यात. एकदा सादर केलेले मुळ कागदपत्र कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाहीत. तसेच त्या कागदपत्राची सत्यप्रत हवी असल्यास रु.१०/- शुल्क भरून उपलब्ध होऊ शकेल.

* विद्यार्थ्यास दाखल्याची / टि.सी.ची व्दितीय प्रत अथवा गुणपत्रिका हवी असल्यास मुळ दाखला गुणपत्रिका गहाळ झाल्याबाबत प्रथम श्रेणी न्यायाधिशाने प्रमाणीत केलेले शपथपत्र दाखल केल्याशिवाय व्दितीय प्रत मिळणार नाही.
* महाविद्यालयात व परीसरातील कोणत्याही वस्तूची, सामानाची, फर्निचरची, प्रयोगशाळा साहित्य व इतर संपत्तीचे नुकसान करू नये. ह्यासाठी विद्यार्थी किंवा सामुहिकरित्या जबाबदार ठरतील व पुढील कार्यवाहीस जबाबदार राहतील.
* प्राध्यापक कक्ष / विद्यार्थीनी कक्ष / संगणक कक्ष / इ.कडे तसेच कार्यालयासमोर कामाच्या व्यतीरिक्त फिरू नये.
* कार्यालयातील / कार्यालयासमोरिल / प्राध्यापक कक्षातील बेंच / खुर्च्यांवर विद्यार्थ्यांनी बसू नये.
* कॉलेज परीरात गोंगाट करणे, विनाकारण फिरणे, भांडण करणे, बाहेरील विद्यार्थ्यांना आपल्यासोबत घेवून परीसरात येणे फिरणे, फलकावर लिहीणे, किंवा कोणत्याही कारणास्तव शिस्त भंग होत असल्यास त्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
* शासनाच्या निर्णयानुसार महाविद्यालयात व परीसरात मोबाईलचा वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. कोणी विद्यार्थी महाविद्यालय व परीसरात मोबाईलचा वापर करतांना आढळल्यास तो जप्त करण्यात येईल तसेच दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
* महाविद्यालयात कोणत्याही प्रकारे रॅगिंग करताना विद्यार्थी आढळल्यास अथवा तशी तक्रार आल्यास कठोर कार्यवाही केली जाईल.
* महाविद्यालयाची कोणतीही माहिती विद्यार्थ्यांना प्राचार्यांच्या परवानगीशिवाय वर्तमानपत्रात किंवा इतर ठिकाणी छापता येणार नाही.
* विद्यार्थ्याला कोणताही दाखला प्रमाणीत करून घ्यावयाचा असल्यास प्रत्येक प्रतीसाठी रु. १०० शुल्क द्यावे लागेल.
* बोनाफाईड प्रमाणपत्र/जन्मतारखेचा दाखला/इबीसी/शिष्यवृत्ती मंजुरी आदेश क्रमांक / कॅरेक्टर प्रमाणपत्र इ. आवश्यक असल्यास रु. २० शुल्क भरावे लागेल.
* महाविद्यालयाच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळ सोमवार ते शुक्रवार दु. ११ ते २ वाजेपर्यंत व शनिवारी ११ ते १ वाजेपर्यंत राहील. विद्यार्थ्यांनी यावेळेतच कार्यालयातच कार्यालयीन कामकाजाकरिता व आर्थिक देण्याचे घेण्याचे व्यवहारसाठी भेटावे.
* महाविद्यालयात अनामत ठेवलेली रक्कम महाविद्यालय सोडल्यानंतर एका शैक्षणिक सत्राच्या आत काढून घेणे आवश्यक आहे. अनामत रक्कम दरवर्षी १ सप्टेंबर ते १० सप्टेबर कालावधीतच मिळु शकेल. महाविद्यालयाचे ओळखपत्र व पावती असल्याशिवाय अनामत रक्कम मिळणार नाही.
* वरील प्रमाणे महाविद्यालयात शैक्षणिक वातावरण निर्मिती व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेवून संपूर्ण परिसरामध्ये शिस्त ठेवण्याची जबाबदारी सर्व विद्यार्थ्यांची असल्यामुळे सर्वांनी पुर्ण सहकार्य करावे. व बेशिरत्त असणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावे कार्यालयासमोर आणावी म्हणजे दोषी विद्यार्थ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात येईल व वेळप्रसंगी महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल याची प्रत्येक विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

वरील नियमात बदल करणे, सुधारणा करणे, ते अधिकार महाविद्यालयाच्या प्राचार्यास राहतील. वेळोवेळी अस्त्वित येणाऱ्या नियमाचे पालन करने हे प्रत्येक विद्यार्थ्याचे आद्य कर्तव्य आहे.

## पालकांसाठी महत्वाची सुचना :

पालकांनी आपल्या पाल्याची उपस्थिती, प्रत्येक महाविद्यालयीन परीक्षेचे गुण इत्यादी संदर्भात महाविद्यालयाच्या सतत संपर्कात रहावे. व महाविद्यालयाच्या उज्वल यशासाठी सहकार्य करावे. दर महिन्याला चौथ्या शनिवारी पालकांनी आपल्या पाल्यासोबत प्राचार्यांशी संपर्क साधावा ही नम्र विनंती.

## गणवेश :

महाविद्यालयाने ठरविलेल्या गणवेश विद्यार्थ्यांनी परिधान करणे आवश्यक आहे. यासोबत महाविद्यालयाचे ओळखपत्र आवश्यक आहे अन्यथा महाविद्यालयात वावरता येणार नाही.



Principal
प्राचार्य
Late. Ku. Durga K. Banmeru Science College
LONAR, Dist.Buldhana

## महाविद्यालयातील विशेष सुविधा

* सर्व विद्यार्थ्यांकरिता पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी आर. ओ. चे फिल्टर व कुलिंगची व्यवस्था आहे.
* मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आहे.
* मुलींसाठी सॅनेटरी नॅपकीन मशीन उपलब्ध आहे.

## आरोग्य सुविधा

१) महाविद्यालयात प्रवेशीत विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येते. २) विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी महाविद्यालयाव्दारे मान्यताप्राप्त वैद्यकीय अधिका-यांची नेमणुक केली आहे. ज्यांच्या नियुक्तीस संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे मान्यता घेतली जाते.

३) महाविद्यालयात प्रथमोपचार पेटी उपलब्ध आहे. यामुळे तातडीचे उपचार करण्यात येतात.

४) महाविद्यालयातील वातावरण विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक हायजेनीक आहे व त्यासाठी स्वच्छता राखली जाते. तसेच पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय केलेली आहे.

५) महाविद्यालयातील विद्यार्थ्याबरोबरच समाजातील घटकासांठी महाविद्यालयाव्दारे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीरांचे आयोजन करण्यात येते.

## महाविद्यालय परिसरात रॅगिंग विषयी नियमावली

रॅगिंग म्हणजे कोणत्याही शैक्षणीक संस्थेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याकिडुन कोणतीही लेखी किंवा तोंडी कृती की ज्या मुळे एखादया विद्यार्थ्याला दु:ख किंवा कष्ट होईल असे असभ्य वर्तन.

## रॅगिंगमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी

१) एखादया विद्यार्थ्याकिडुन दुस-या विद्यार्थ्यांना इतरासमोर अपमानास्पद वागणूक देणे.

२) छळ करणे.

३) एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या मनाविरूद्ध कृत्य करण्यास भाग पाडणे.

४) त्यांच्यात दहशतीचे वातावरण निर्माण करणे.

५) अमानवीय गैर प्रकार करून घेणे.

६) अशी कृती करणे ज्यामुळे विद्यार्थ्यामध्ये मानसिक दडपण येईल.

## रॅगिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ नुसार कोणती शिक्षा होऊ शकते.

रॅगिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ नुसार जी व्यक्ती कोणत्याही शैक्षणीक संस्थेमध्ये किंवा तीच्याबाहेर प्रत्यक्षरित्या किंवा अप्रत्यक्षरित्या रॅगिंग करित असेल किंवा त्याचा प्रसार करीत असेल तर त्या व्यक्तीला अपराध सिध्दतेनंतर दोन वर्षापर्यंत इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि दहा हजार रूपयापर्यंत द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

## रॅगिंग अपराधाबद्दल सजा झालेल्या अपराध्यास कादून टाकण्यात येते काय ?

**रॅगिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ५ नुसार रॅगिंगचा अपराध करणा-याला अपराध सिध्दतेनंतर कादून टाकण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. कलम ४ : खालील एखाद्या अपराधा बद्दल अपराध सिध्द झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास शैक्षणीक संस्थेतुन कादून टाकण्यात येईल आणि अशा प्रकारे कादून टाकण्यात आल्याच्या आदेशाच्या दिनांकापासुन पाच वर्षाच्या कालावधीकरिता कोणत्याही इतर संस्थेमध्ये अशा विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच कलम ६ अन्वये विद्यार्थ्यांना निलंबीत करणे यासंबंधी तरतूद आहे.**

Principal
प्राचार्य
Late. Ku. Durga K. Banmeru Science College
LONAR, Dist.Buldhana